अभियंता (प्रशासन)
९७८

मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करावयाच्या कालव्यावरील बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्र संदर्भातील तरतुदीतील सुधारणा.

महाराष्ट्र शासन
पाटबंधारे विभाग
शासन परिपत्र क्र. सीडीए १०९५/२०१९/[४९/९५]मोप्र [प्र].
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १० जून १९९७

संदर्भ : [१] शासन परिपत्रक क्र. सीडीए १०८४/[३८९/८४] मोप्र[प्र], दि. ३१ डिसेंबर १९८४.
[२] शासन पत्र क्र. सीडीओ १०८७/७५१/[४४४/८७] मोप्र[प्र], दि. २०. ४. १९८८.
[३] शासन पत्र क्र. सीडीओ १०९५/२०२९/[४९/९५] मोप्र[प्र], दि. १. ७. १९९६.
[४] शासन परिपत्रक क्र. सीडीओ १०९५/२०२९/[४९/९५] मोप्र[प्र], दि. १७. १०. ९६.

पूर्वपिठीका -:

उपरोक्त [१] येथील संदर्भिय परिपत्रकातील परिच्छेद ३[ए] मधील तरतुदीप्रमाणे कालव्यावरील ज्या बांधकामाची किंमत ५० लक्ष रुपयापेक्षा जास्त असेल अशा बांधकामाचीच संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने करावीत असे आदेश देण्यात आले होते. उपरोक्त [२] येथील संदर्भिय परिपत्रकानुसार १९८४ च्या परिपत्रकातील या संदर्भातील तरतुदीमध्ये बदल करण्यात येऊन कालव्यावरील बांधकामाची किंमत १ कोटी रुपयापेक्षा जास्त असेल तरच संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने करावीत असे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात आले होते.

त्यानंतरच्या कालावधीत उपरोक्त संदर्भ [३] येथील शासन पत्रामध्ये मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेने करावयाच्या कालव्यावरील बांधकामाच्या संकल्पचित्रासंदर्भात किंमतीची मर्यादा न ठेवता कालव्याची विसर्गक्षमता व स्तंभाची तळपातळीपासूनची उंची या भौतिक परिमाणांशी निगडीत मापदंड निर्गमित करण्यात आले होते. तथापि या शासन पत्रामध्ये अंतर्भूत असलेल्या मापदंडात काही उणीवा नजरेत आणून देण्यात आल्या होत्या. उदा. कालव्याचा विसर्ग ३५ घ.मी./सेकंद ऐवजी ३५ घ.फू./सेकंद असा मापदंड नजरचुकीने उल्लेखिण्यात आला होता. तसेच स्तंभाची तळपातळीपासूनची उंची असे नमूद करण्याऐवजी स्तंभाची जलपातळीपासूनची उंची असेही सदर परिपत्रकात नजरचुकीने नमूद झालेले आहे. शिवाय बांधकामाच्या किंमतीसंदर्भात या शासनपत्रात उल्लेख करण्याचे राहून गेले आहे. [वरील परिस्थितीत उपरोक्त संदर्भात[३] येथील

कृ.मा.प.

पत्रान्वये निर्गमित केलेले आहे] शिवाय बांधकामाच्या किंमतीसंदर्भात शासनपत्रात उल्लेख करण्याचे राहून गेले आहे. वरील परिस्थितीत उपरोक्त संदर्भ [२] येथील पत्रान्वये निर्गमित केलेले मापदंड उपरोक्त संदर्भ [४] येथील परिपत्रकान्वये सुधारण्यात आले आहेत. मात्र उपरोक्त संदर्भ [४] येथील परिपत्रकातील १.०[क] येथील मापदंडही सुधारण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात आता पुढीलप्रमाणे सुधारीत आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

आदेश :

१.० कालव्यावरील जी बांधकामे खाली नमूद केलेल्यापैकी कोणत्याही एका मापदंडात बसत असतील अशा बांधकामांची संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटना, नाशिक यांनी करावीत.

शासन शुद्धीपत्रकानुसार (दि. ३१-८-९८) रु. ५० लक्ष ते २५० लक्ष असा वाचावे

अ - ज्या बांधकामाची किंमत रु. ५० लक्ष ते (१००) 250 लक्ष इतक्या मर्यादित आहे, परंतु कालव्याचा विसर्ग ३५ घमी/सेंकद पेक्षा जास्त आहे, अशा कालव्यावरील बांधकामाचे [स्ट्रक्चरचे] संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करण्यात यावीत.

ब- कालव्यावरील बांधकामाच्या स्तंभाची [पिलरची] तळपातळी [फाउंडेशन] पासूनची उंची जर १५ मी. अथवा त्यापेक्षा जास्त असेल तर अशा बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करावीत.

क - कालव्यावरील ज्या बांधकामाची किंमत २.५ कोटी रुपयापेक्षा जास्त असेल अशाही बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत करण्यात यावीत.

ड - कालव्यावरील बांधकामास नुकसान पोहोचल्यामुळे होणारे नुकसान [हॅझार्ड पोटेंशियल स्ट्रक्चर] जर १ कोटी रुपयापेक्षा जास्त असेल तर अशाही बांधकामाचे संकल्पन व संकल्पचित्रे मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेमार्फत व्हावीत. मात्र कालव्यावरील अशा बांधकामाच्या फुटीमुळे होणा-या नुकसानीसंदर्भात, म्हणजेच हॅझार्ड पोटेंशियल संदर्भात, संबंधित मुख्य अभियंता यांना प्रमाणपत्र देणे आवश्यक राहील.

२.० उपरोक्त सुधारीत आदेशाप्रमाणे कालव्यावरील बांधकामाच्या संदर्भात संकल्पने व संकल्पचित्रे तयार करण्याबाबत मध्यवर्ती संकल्पचित्र



४३५

संघटना, नाशिक व क्षेत्रिय अधिका-यांनी कार्यवाही करावयाची आहे.

प्र.तु.रेडकर

[ भ. तु. रेडकर ]

शासनाचे उपसचिव.

प्रत -:

पाटबंधारे विभागातील सर्व मुख्य अभियंता
पाटबंधारे विभागातील सर्व अधीक्षक अभियंता
पाटबंधारे विभागातील सर्व तांत्रिक कार्यासने / सर्व उपअभियंता
मध्यवर्ती संकल्पचित्र संघटनेचे सर्व अधीक्षक अभियंता [५ जादा प्रतींसह]
मोप्र[प्र] कार्यासन संग्रहार्थ.

२. अधीक्षक अभियंता यांना विनंती करण्यात येते की, उपरोक्त परिपत्रक त्यांनी त्याच्या अधिपत्याखालील कार्यकारी अभियंता यांच्या निदर्शनास आणावे.

सर्व मंडळांस ज्ञात पाठविली आहे.

Thele. ८.१६

शविसो६६